सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२३/ 152
दिनांक 17 JAN 2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी
तांत्रिक अभ्यासक्रमाच्या संस्था,अमरावती विभाग,
अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या विद्यार्थी/संस्था स्तरांवर प्रलंबित अर्जांवरील कार्यवाहीबाबत... (व्हिडीओ - कॉन्फरन्सीव्दारे बैठक)**

**संदर्भ :** या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२३/१३८ दिनांक १३/०१/२०२३

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,मंत्रालय,मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलव्दारे (संकेतस्थळ www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, डीबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन संस्थास्तरावर योजनेच्या अटी व शर्तीनुसार पडताळणी करुन पुढे पाठविण्याबाबत यापुर्वी कळविण्यात आलेले आहे.

तरी दिनांक १६/०१/२०२३ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार या विभागातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील २०४ व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील २९२८ अर्ज संस्थास्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहेत. याबाबत आपणास कळविण्यात येते की, प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांकडून पात्र असलेल्या योजनेकरीता अर्ज भरुन घेण्यात यावेत व संस्थास्तरावर पडताळणीकरीता प्रलंबित असलेले विद्यार्थ्यांचे अर्ज योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासून तात्काळ निकाली काढण्यात यावेत.

तसेच यासंबंधी **दिनांक १८.०१.२०२३ रोजी सकाळी ११.३०** वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सीव्दारे बैठक आयोजित केलेली आहे. तरी सदर बैठकीस प्राचार्य यांनी उपस्थित राहावे. बैठकीची लिंक खालीलप्रमाणे आहे.

meet.google.com/wsv-smvv-inh

**(डॉ.व्ही.आर.मानकर)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत: **प्रोग्रामर**, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.